## APPENDIX-II

### दि. २०-१२-१९८२ चे वाई नगरपालिकेचे परिपत्रक

वाई नगरपालिका कार्यालय,
जा. क्र. वशी. १२/४२८/१९८२.
दिनांक:- २०/१२/१९८२.

-:- परिपत्रक -:-

सर्व, घरमालक/भोगवटादार,

( ज्यांचे घरांत टोपली संडास आहेत असे)

या परिपत्रकाव्दारें कळविणेंत येत आहे की नगरपालिकेने सर्व घर मालकांना त्यांचे घरांतील टोपली पध्दतीचें संडासाचे रुपांतर सेप्टिकमध्यें करण्यासंबंधी नोटीसा दिल्या आहेत. व अंतीम मुदत ३१/३/८३ दिली आहे. या संबंधी असे स्पष्टीकरण करणेंत येत आहे की ज्याअर्थी नगरपालिकेने नोटीसा दिल्या आहेत. त्याअर्थी आतां घरमालकांना पुन्हां लेखी अर्ज करुन नकाशा जोडून परवानगी मागण्याची आवश्यकता नाही. मात्र बांधकाम हे शासनाचे टाइप डिझाइनप्रमाणें पाहिजे. डिझाइन या कार्यालयांत पहाण्यासाठी फक्त उपलब्ध होईल. जागेच्या अडचणीमुळें डिझाइनमध्यें बदल झाला तरी चालेल. मात्र तांत्रिक बाबी सांभाळल्या गेल्या पाहिजेत.

तसेच बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्र अनुदानासाठी अर्ज करावयाचा आहे. सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यावर अनुदान अदा करणेंत येईल.

विशेषटीप:- भविष्यात भुयारी गटार योजना अस्तीत्वांत आल्यावर त्या गटारांस सहजरित्या संडासचें मैलापाणी मिळवता आले पाहिजे अशी संरचना करावी. सेप्टीक संडासचें अेफलुअंट वॉटर(सांडपाणी) नगरपालिकेच्या गटारांत सोडणें हे हानीकारक नाही.

मुख्याधिकारी
वाई नगरपालिका वाई

प्रशासक
वाई नगरपालिका वाई.